Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# समाधानाचा समर्थ मार्ग

21 Oct 2011, 0705 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

समर्थ रामदासस्वामींच्या सगळ्या शिकवणुकीचा भर आहे तो उत्तम मनुष्य घडवण्यावर. केवळ पारमार्थिक बाबतीतल्या उत्तम ग ुणांवर न थांबता, संसारी, प्रापंचिक मनुष्यही कसा आदर्श घडेल, याकडे समर्थांचा कल आहे. आजच्या आधुनिक जगात यशस्वी होण्यासाठी काय करावे? आपले व्यक्तिमत्त्व कसे विकसित करावे? जगात कसे वागावे? कशामुळे खरे समाधान मिळते हे सांगणारी अनेक पुस्तके आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रांतली यशस्वी, कर्तृत्ववान माणसे आपले अनुभव शेअर करताना दिसतात. समर्थांनी यातील अनेक गोष्टी त्यांच्या लेखनातून १७व्या शतकातच सांगितल्या आहेत. या जगात खरे समाधान कसे मिळेल हे सांगताना समर्थ म्हणतात, शरीर परोपकारी लावावे। बहुतांच्या कार्यास यावे। उणे पडो नेदावे। कोणियेकाचे।।

आपल्या भोवतालच्या समाजा-तील इतरांच्या अडचणीला धावून जावे, कोणाचे काही काम अडले असेल तर त्याला मदत करावी, दुसऱ्याच्या दु:खास आपले दु:ख मानावे आणि दुसऱ्याचे भले झाल्याचा आनंद मानावा असे समर्थ सांगतात. इतरांना मदत कशी करावी याचे खूप सुरेख उदाहरण ते देतात. आपण येथेष्ट जेवणे। उरले ते अन्न वाटणे। परंतु वाया दवडणे। हा धर्म नव्हे।। तैसे ज्ञाने तृप्त व्हावे। तेंचि ज्ञान जनांस सांगावे। तरतेन बुडो नेदावे। बुडतयासी।।

आपले पोट भरल्यावर उरलेले अन्न दुसऱ्या भुकेल्या व्यक्तीला देणे हा जसा धर्म आहे, त्याचप्रमाणे तुम्हाला जे ज्ञान मिळाले असेल त्यावर स्वत:च तृप्त न होता, ते इतरांना द्यावे. पोहता येत असले-ल्यांनी बुडत्याला वाचवावे तसे ज्ञानी लोकांनी इतरांना वाचवावे.

रामदासस्वामींचे हे विचार मी लहानपणापासून ऐकत आलो आहे. माझे वडिल-आई ज्याप्रकारे आजारी रुग्णांची, गरजू विद्यार्थ्यांची सेवा करायचे ते मी पाहिले, अनुभवले. त्यामुळे कमावत्या वयातच मला इतरांना मदत करण्याचा छंद लागला. माझ्या पहिल्या वहिल्या कमाईच्या ५२२ रुपयांतले ४०० रु. मी एका गोरक्षण संस्थेला दान केले. माझा इंजिनीअरींगचा निकालही लागला नव्हता, तेव्हा मी व. पु. काळेंच्या आवाहनावरून एका गरजू व्यक्तीला मुलीच्या शिक्षणासाठी हजार रुपये देण्याचे वचन दिले आणि ते पूर्णही केले. नंतर मी माझ्या वडिलांच्या सल्ल्यानुसार निरगुडकर फाऊंडेशन हा ट्रस्ट बनवला. या ट्रस्टच्या माध्यमातून हजारो कॅन्सरग्रस्तांना आम्ही मदत करू शकलो. शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा पुरवू शकलो आणि अनेक श्रेष्ठ कलाकारांचे कार्यक्रम गावागावातील रसिकां-पर्यंत नेऊ शकलो. आज मला या सगळ्यातून विलक्षण समाधान नक्की लाभले आहे. समर्थ म्हणतात, कीतीर् पाहों जाता सुख नाही। सुख पाहतां कितीर् नाही। विचारेवीण कोठेची नाही। समाधान।। हे विचारपूर्वक केलेल्या कृत्यातून मिळणारे समाधान सर्वात महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. कीतीर्, सुख या गोष्टी क्षणभंगुर आणि सापेक्ष आहेत. पण एखाद्याला मदत केल्यावर मनाला होणारे समाधान मात्र कायमचे असते. त्यामुळे सदा सर्वदा तत्पर परोपकारासी हा समर्थ रामदासस्वामींचा उपदेशच तुम्हाला शाश्वत समाधानाचा रस्ता दाखवेल.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768